# NIDHI GRANITES LIMITED

CIN- L51900MH1981PLC025677

29th December, 2020

To
The Manager
Department of Corporate Services
BSE Limited
P. J. Towers, Dalal Street,
Mumbai – 400001

**Scrip Code: 512103**

**Sub: Publication of Notice of Board Meeting.**

Dear Sir/Madam,

In compliance with the provisions of Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed herewith copies of newspaper advertisement published in **"FINANCIAL EXPRESS"** (in English) and **"THE GLOBAL TIMES"** (in Marathi) on 28th December, 2020 informing about the Board Meeting scheduled to be held on Monday, 11th January, 2021 to, *inter alia*, to consider and approve the Un-Audited Financial Results of the Company for the **Third Quarter and Nine months ended on 31st December, 2020.**

You are requested to take same on your record.

Please take this letter on your record and disseminate the information under "Corporate Announcement" on your Exchange website.

Thanking you,
Yours faithfully,
**For NIDHI GRANITES LIMITED**

**Nidhi Aggarwal**
**Managing Director**
**DIN: 00785248**



## हॉटेल थांब्यावर एसटी १५ मिनिटांहून अधिक थांबल्यास कारवाई

नागपूर : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) त्यांच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा वेळ वाचवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यानुसार कुठल्याही हॉटेलच्या थांब्यावर बस १५ मिनिटांहून अधिक वेळ थांबल्यास संबंधित बस चालक-वाहकाची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. यासंबंधीचे आदेश एसटीच्या सर्व विभाग नियंत्रकांकडे देण्यात आले आहेत.

एसटी बसेससाठी लांबच्या प्रवासादरम्यान विविध थांबे निश्चित करण्यात आले आहेत. काही चालक-वाहक प्रवाशांना जेवणासह इतर सुविधांचा लाभ घेता यावा म्हणून जास्त वेळ बस थांबवून ठेवतात. या प्रकारामुळे बसमधील प्रवाशांचा प्रवास कालावधी लांबतो. परिणामी प्रवासी एसटीचा पर्याय कमी निवडतात. ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक विभाग नियंत्रकाला चालक-वाहकांना स्पष्ट सूचना देण्यास सांगण्यात आले आहे. या चालक-वाहकांना त्याबाबत बसमधील प्रवाशांनाही तशी सूचना द्यायची आहे. सोबतच मार्ग तपासणीपथक आणि पर्यवेक्षकांना वेळोवेळी पाहणी करून थांब्यावर १५ मिनिटांहून अधिक काळ बस थांबताना दिसल्यास संबंधित यंत्रणेला सूचना द्यायची आहे. त्यानंतर संबंधित बसच्या चालक-वाहकाची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई केली जाणार आहे.

## मालेगावी चित्रपटगृहांना प्रेक्षकांची प्रतीक्षा

मालेगाव : शहर सिने रसिकांमुळे प्रसिद्ध आहे. शहरात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अटी शर्तीसह चित्रपट गृहे सूरु झाले. शहरात सुमारे पंधरा चित्रपट गृहे आहेत. यातील पाच सहा गृहे विविध प्रकारच्या कारणांमुळे कायमची बंद झाली आहे. लॉकडाऊन नंतरच्या नवीन नियमानुसार सर्व चित्रपट गृह सूरु होणे सिनेरसिंकाना अपेक्षित होते पण त्यांच्या अपेक्षा फोल ठरल्या. शहरातील मोजके चार पाच सिनेमा गृहे सूरु झाली आहेत तर उर्वरित पाच सहा सिनेमागृह अद्यापही बंद आहेत. जे सुरु आहे त्यामध्ये आवडते सिनेमे लागले नसल्याने प्रेक्षकांनी तिकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे या व्यावसायिकांनी चिंता व्यक्त केली आहे. गेल्या सहा सात महिने सिनेमागृहे बंद होती. कर्मचारी वर्गाला घरातूनच वेतन द्यावे लागले. पुन्हा सिनेमा गृहे सुरु झाल्यानंतर परिस्थिती बदलली जाईल अशी अपेक्षा फोल ठरली. या परीस्थितीत बदल होण्याची प्रतिक्षा चित्रपटगृह चालकांमध्ये आहे.

# भीमा व सीनेतील वाळू लिलाव बंद

## सोलापुरातील बांधकामाला तापी नदीची वाळू



सोलापूर : लॉकडाऊनचे नियम शिथिल झाल्यावर सोलापुरात बांधकामे धुमधडाक्याने सुरू झाली आहेत. भीमा व सीनेतील वाळू लिलाव बंद असताना इतकी बांधकामे कशी सुरू आहेत, याचा शोध घेतल्यावर सोलापुरात ६५० किलोमीटर प्रवास करून तापी नदीचीवाळू आणली जात आहे.

स्थानिक वाळूपेक्षा तेथील वाळू महाग असली तरी बांधकाम थांबायला नको, यासाठी सोलापूरकरांनी हा पर्याय निवडला आहे. दोन वर्षांपासून वाळूचे लिलाव बंद असल्याने जिल्ह्यात वाळूची टंचाई जाणवत आहेत. यामुळे बांधकामे थांबली होती. कोरोना महामारी सुरू झाल्यानंतर सर्व कामे थांबली होती. लॉकडाऊनचे नियम शिथिल झाल्यानंतर बांधकाम क्षेत्राला गती आली. डस्टद्वारे वाळू टंचाईवर मात करीत बांधकामे सुरू झाली आहेत. डस्टच्या वापराने कॉलम, विटाचे बांधकाम, सिमेंट विटा तयार करण्याला गती आली आहे. मात्र स्लॅब व गिलावा पक्का होण्यासाठी चांगल्या प्रतीच्या वाळूचा आग्रह अभियंते करीत आहेत. त्यामुळे वाळूचा चोरटा उपसा होत असल्याचे चित्र दिसत होते. पण महसूल, पोलीस प्रशासनाने मोहीम तीव्र केल्यावर वाळूचा शोध सुरू झाला.

### अशी होते वाहतूक

सोलापुरातील कारखान्यात तयार झालेले सिमेंट नाशिकला मोठ्या प्रमाणावर नेले जाते. सिमेंट वाहतूक करणाऱ्या ट्रकचालकांनी येताना रिकामे येण्याऐवजी सुमारे सव्वाशे किलोमीटर प्रवास करून नंदुरबार जिल्ह्यातील तापी खोऱ्यातील वाळू आणण्यास सुरुवात केली. याला चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर आता चौकाचौकांत एजंट निर्माण झाले आहेत. दररोज २० ट्रक वाळू सोलापुरात येत आहे.


### वाळू वाहतुकीला परवानगी

तापी खोऱ्यात चौदाचाकी ट्रकमध्ये १२ हजारांना वाळू भरून दिली जाते. ही वाळू देशभर वाहतूक करण्यास परवानगी आहे. त्यामुळे आरटीओ, वाहतूक पोलीस, स्थानिक पोलीस यांचा त्रास होत नाही. सोलापुरात ब्रासला सात हजार दर शासन घेते. परंतु तापी नदीत १२ हजारांना साडेसहा ब्रास वाळू भरून दिली जाते. सोलापूरला वाळू पोहोचण्यासाठी २८ हजारांचे डिझेल लागते. त्याचबरोबर सिमेंट वाहतुकीचे भाडे मिळते, असे ट्रकचालक आरवत यांनी सांगितले.

# पार्थ पवारांना पंढरपुरातून उमेदवारी?

## रोहित पवारांनी सांगितलं 'राजकारण'






नाशिक/ मुंबई - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार भारत भालके यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातून कोणाला उमेदवारी मिळणार याची जोरदार चर्चा सुरू आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांना पोटनिवडणुकीत उमेदवारी मिळू शकते. तशी मागणी माजी आमदार औदुंबर अण्णा पाटील यांचे नातू अमरजित पाटील यांनी केली आहे. त्यानंतर, राजकीय वर्तुळात पार्थ पवार यांच्या आमदारकीवरुन चांगलीच चर्चा रंगली आहे. यासंदर्भात रोहित पवार यांनी मीडियाशी बोलताना आपलं मत व्यक्त केलंय.

पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात भावनेचं नाही तर विकासाचं राजकारण व्हायला हवं, अशा आशयाचं पत्र अमरजित पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना लिहिलं आहे. पार्थ पवार पंढरपूरमध्ये आल्यास रखडलेली विकासकामं लवकर होतील. त्यामुळे पार्थ यांना संधी दिली जावी, अशी मागणी अमरजित पाटील यांनी केली आहे. भालके यांच्या निधनानंतर शरद पवारांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केलं. मात्र भालकेंच्या जागी कोणाला उमेदवारी मिळणार याबद्दल भाष्य करणं त्यांनी टाळलं.

त्यामुळे पंढरपूरमध्ये कोणाला संधी मिळणार याबद्दलचा सस्पेन्स कायम आहे.पार्थ पवार यांच्या पंढरपुरातील उमेदवारीसंदर्भात रोहित पवार यांना विचारले असता, कुणी मागणी केली म्हणून लगेच पूर्ण होईल, असे नाही, असं म्हटलंय. तसेच, पवारसाहेब, अजित दादा, तिथले पालकमंत्री यासंदर्भातील निर्णय घेतील. कार्यकर्ते बोलून जातात पण निर्णय नेते घेतात. तिथे असलेल्या लोकांना योग्य तो न्याय दिला जाईल असा मला विश्वास आहे, असं रोहित पवार म्हणाले. परिस्थिती आणि कार्यकर्त्यांची मागणी लक्षात घेतली जाईल. कुणी अशी मागणी केली म्हणून लगेच ती पूर्ण होईल असं होत नाही, असंही रोहित यांनी सांगितलं.

# वीज मीटर काढून नेले, पण बिल पाठवणे सुरूच



नागपूर : वीज बिलातील चुकांच्या बाबतीत विक्रमावर विक्रम करीत असलेल्या महावितरण कंपनीचा नवीन प्रताप पुढे आला आहे. कंपनीने एका ग्राहकाचे वीज मीटर ऑगस्टमध्ये काढून नेले, पण त्या ग्राहकाला दर महिन्याला बिल पाठवले जात आहे. त्या ग्राहकास अद्याप सिक्युरिटी डिपॉझिट मिळाले नाही. उलट त्याला वीज बिलांना तोंड द्यावे लागत आहे.

पुरुषोत्तम गणेशानी असे ग्राहकाचे नाव आहे. वीज मीटर परत करणाऱ्या अनेक ग्राहकांना गणेशानी यांच्यासारखा मनस्ताप होत आहे. गणेशानी यांचे खामला रोडवरील कमल मेडिकोज येथे दोन वीज कनेक्शन होते. त्यामुळे त्यांनी एक कनेक्शन कमी करण्यासाठी अर्ज केला होता. त्यानुसार २५ ऑगस्ट रोजी एक वीज मीटर परत नेऊन वीज कनेक्शन कापण्यात आले. असे असताना गणेशानी यांना पुढील महिन्यात १११० रुपयाचे बिल पाठविण्यात आले. त्यानंतर २६६० व ३०६० रुपयांचे बिल देण्यात आले. आश्चर्याची बाब म्हणजे विजेचा वापर केवळ १ युनिट दाखवण्यात आला. या मीटरचे जुलैतील बिल केवळ १० रुपये होते हेदेखील येथे उल्लेखनीय आहे. महावितरणच्या या प्रतापामुळे गणेशानी त्रस्त झाले आहेत. त्रिमूर्तीनगर कार्यालयातील अधिकाऱ्यांनी त्यांना, आधी वीज बिल भरा, नंतर तक्रारीचे निराकरण करू असे सांगितले आहे. गणेशानी बिल भरण्यास तयार नाहीत.

### गंभीर प्रकरण

हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. प्रकरणाची चौकशी केली जाईल. मीटर काढल्याची माहिती सिस्टीममध्ये फिड करण्यात आली नसेल असे दिसून येत नाही. ग्राहकाला नियमानुसार सिक्युरिटी डिपॉझिट परत केले जाईल. त्यासाठी पोर्टलवर अर्ज करता येतो.

# प्रियकराने प्रेयसीला भर चौकात जिवंत जाळले

## अंजुमन महाविद्यालयासमोरील भयंकर घटना

नागपूर : प्रेमीयुगुलात टोकाचा वाद होऊन प्रियकराने आपल्या विवाहित प्रेयसीला जिवंत जाळल्याच्या घटनेनं नागपूर हादरलं आहे. ही भयंकर घटना अंजुमन अभियांत्रिकी महाविद्यालयासमोर शुक्रवारी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास घडली. आगीत होरपळलेल्या प्रेयसीनं उपचारादरम्यान प्राण सोडले.

शबाना अब्दुल जावेद (वय ४०, रा. महेद्रनगर) असं मृत महिलेचं नाव आहे. शबाना धंतोली आदित्य मोटर्स येथे कार्यरत होत्या. शुक्रवारी सायंकाळी त्यांचा प्रियकरासोबत वाद झाला.

बघता बघता त्यांच्यातील वाद टोकाला गेला. संतापलेल्या प्रियकराने बाटलीतील पेट्रोल शबाना यांच्या अंगावर टाकले. त्यानंतर शबाना यांना पेटवून देत प्रियकर घटनास्थळावरून पसार झाला.

प्रियकर दुचाकीवर निघून गेल्यानंतर आजूबाजूच्या नागरिकांनी हे दृश्य बघून घटनास्थळी धाव घेतली. आग विझवून शबाना यांना खासगी रुग्णालयात दाखल केलं.


**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), मुंबई यांचे कार्यालय**

**दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**

भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, सहकार नगर जवळ,
नायगांव रोड नं. २६, मुंबई-४०० ०३१.

**जाहीर नोटीस**

**दि म्युनिसिपल को-ऑप. बँक लि., मुंबई ... अर्जदार**
२४५ म्युनिसिपल बँक भवन,
पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई-४००००१.

**अनुक्रमांक १ ते ६ ... जाब देणार**

खालील दर्शविलेल्या विषयासंदर्भात जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला** मिळणेसाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून **दिनांक १३.०१.२०२१** रोजी **दुपारी १२.००** वाजता आपण स्वतः वरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणेः-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | जाब देणार क्र. | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | पुढील सुनावणी तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Ravi Kisan Sarsar | १ | ०६.११.२० | १८४६/२० | ६३८३८७ | १३.०१.२१ |
| | Deepak Dalbaug Bidlan | २ | | | | |
| २ | Sanjay Dattaram Jadhav | १ | ०६.११.२० | १८४७/२० | ३३४८१९ | १३.०१.२१ |
| ३ | Sanjiv Krishna Sangnor | १ | ०६.११.२० | १८४८/२० | ४१५६३३ | १३.०१.२१ |
| ४ | Sanjivani Bapu Shinde | १ | ०६.११.२० | १८४९/२० | १५३९५६ | १३.०१.२१ |
| ५ | Shashikant Chandar Chavan | १ | ०६.११.२० | १८५०/२० | ४४२५७५ | १३.०१.२१ |
| ६ | Shivdas Mahadeo Salvi | १ | ०६.११.२० | १८५१/२० | ७७६८६१ | १३.०१.२१ |

ही नोटीस आज **दिनांक २३.१२.२०२०** रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

शिक्का

सही/-
**श्री. सुनिल बनसोडे**
उपनिबंधक, सहकारी संस्था
**मुंबई (परसेवा) दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई**


# सातारा–कास मार्गावर पिसाणी फाटा येथे मिनीबसचा अपघात

## इस्लामपूरमधील चार जण किरकोळ जखमी !



पेट्री/सातारा : सातारा -कास मार्गावर पिसाणी फाटा ता. सातारा येथे आज सकाळी सहा वाजून वीस मिनिटांनी पर्यटनास निघालेल्या मिनीबसचा अपघात होऊन चार जण किरकोळ जखमी झाले. दरम्यान तात्काळ पिसाणी गावचे सरपंच व ग्रामस्थ घटनास्थळी दाखल होऊन अपघातातील जखमींना गाडीतुन बाहेर काढण्यास सहकार्य करून तात्काळ त्यांना उपचारासाठी सातारा येथे रूग्णवाहिकेतुन पाठविण्यात आले.

सलग तीन दिवस सुट्ट्या असल्यामुळे कास तसेच बामणोलीला फिरण्यासाठी पर्यटकांची झुंबड उडाली आहे. इस्लामपूरहून युवकांचा एक ग्रुप टेम्पो ट्रॅव्हलरने वासोटा येथे फिरण्यासाठी निघाला होता. कास रस्त्यावरील पिसाणी या गावाजवळ आल्यानंतर चालकाचे एका वळणावर नियंत्रण सुटले. ग्रामस्थांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार सातारा शहराच्याच्या पश्चिमेस सातारा - कास मार्गावर पिसाणी फाटा येथील मोरी जवळच्या वळणावर आज सकाळी ६ वा.२० मिनिटांनी (एम. एच. १२ एफ सी ३५१६) मिनीबस उलटली.

वाहनात हवा कमी असल्याने व नियत्रंण सुटल्याने अपघात झाल्याचे वाहनचालकाने ग्रामस्थांना सांगितले. या बसमधील इस्लामपुर येथील वैदयकीय महाविद्यालयाचे विदयार्थी असल्याची माहिती मिळाली. दरम्यान अपघातात चार जण किरकोळ जखमी झाले असुन जखमींना बाहेर काढण्यास पिसाणी ग्रामस्थांनी सहकार्य करून त्यांना तात्काळ सातारा येथे रुग्णालयात दाखल करण्यासाठी रुग्णवाहिका बोलवल्याची माहिती पिसाणीचे सरपंच लक्ष्मण गोगावले यांनी माहिती दिली.

हा अपघात झाल्याचे समजताच सातारा तालुका पोलीस आणि शिवेंद्रसिंहराजे ट्रेकर्सच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

जखमींना एका खासगी वाहनाने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. काहींच्या गुडघ्याला तर काहींच्या हाताला खरचटले होते. प्राथमिक उपचार केल्यानंतर मुले रुग्णालयातून निघून गेली. सातारा तालुका पोलीस ठाण्यात या अपघाताची अद्याप नोंद झाली नव्हती.


**BLUE BLENDS (INDIA) LIMITED**
**CIN: L17120MH1981PLC023900**
**Regd. Office:** JBF House 2nd Floor Old Post Office Lane Kalbadevi, Mumbai-400002, Maharashtra **Phone:** +91 – 22 – 22085951,
**Email:** blueblends.ho@gmail.com, **Website:** www.blueblends.com

**Notice of the (39th) Annual General Meeting of the Company**

Notice is hereby given that the Thirty Ninth **(39th) Annual General Meeting (AGM)** of the shareholders of Blue Blends (India ) Limited ("The Company") will be held on Tuesday**, December 29, 2020 at 02.00 p.m.** at the registered office of the Company situated at JBF House 2nd Floor Old Post Office Lane Kalbadevi Mumbai 400002, Maharashtra to transact the Ordinary and Special Businesses as set out in the notice. The copy of the Notice of AGM and instruction for remote e-voting, along with attendance slip and proxy form and Annual Report 2019-2020 has been sent to the members on December 07, 2020 in permitted mode. A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote instead of himself/ herself and the proxy need not be a member of the company. Proxies in order to be effective, should be duly stamped completed, signed and deposited at the registered office of the company not less than 48 hours before the meeting.

**Book Closure for AGM :**
Notice is hereby given that pursuant to Section 91 and other applicable provisions of the Companies Act, 2013 and Regulation 42 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations 2015, that Register of Members and Share Transfer Books of the Company will closed from Saturday, December 26, 2020 to Tuesday, December 29, 2020 both days inclusive for the purpose of AGM.

**Remote E-voting :**
As per Section 108 of the Companies Act, 2013 read with rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 as amended and Regulation 44 of SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015, the company is providing its shareholders the facility to cast their votes by electronic means through the remote e-voting on all the resolutions proposed to be passed at the 36th Annual General Meeting through e-voting service provided by CDSL. The details of remote e-voting are as under:

A. The Remote E-voting will commence on Saturday, December 26, 2020 (09:00 a.m.) and ends on Monday, December 28, 2020 (05:00 p.m.).
B. The cut-off date for determining the eligibility to vote by electronic means or at 39th AGM is Tuesday, December 22, 2020.
C. Any person, who acquires shares of the Company and become member of the Company after dispatch of the Notice of AGM and holding shares as on the cut-off date i.e. Wednesday, December 22, 2020, may obtain the login ID and password by sending a request at evotingindia.com However, if you are already registered with NSDL for remote e-voting then you can use your existing user ID and password for casting your vote. If you forgot your password, you can reset your password by using "Forgot User Details/Password" option available on www.evotingindia.com
D. Members may note that a) the remote e-voting module shall be disabled by cdsl after the aforesaid date and time for voting and once the vote on a resolution is casted by the member, the member shall not be allowed to change it subsequently; b) the facility for voting through polling paper shall be made available at the 39th AGM;) the members who have casted their vote by remote e-voting prior to the 39th AGM may also attend the 39th AGM but shall not be entitled to cast their vote again; and d) a person whose name is recorded in the register of members or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off date shall only be entitled to avail the facility of remote e-voting or voting in the Annual General Meeting,
E. The Notice of the 39th AGM is also available on the website of company www.blueblends.com.

**Place:** Mumbai
**Date:** December 8, 2020

**For, Blue Blends (India) Limited**
**Sd/-**
**Anand Arya Director**
**DIN: 00084995**


# वाहनधारकांना मोठा दिलासा!

## ड्रायव्हिंग लायसन, आरसी, परमीटची व्हॅलिडिटी चौथ्यांदा वाढविली

पुणे : लॉकडाऊनमध्ये संपलेली ड्रायव्हिंग लायसन, आरसी बुक आणि परमिटची व्हॅलिडीटी केंद्र सरकारने चौथ्यांदा वाढविली आहे. 31 डिसेंबरला ही सूट संपणार होती. ती आता 31 मार्च 2021 पर्यंत वाढविण्यात आली आहे.

केंद्र सरकारच्या नव्या नियमांनुसार जर ड्रायव्हिंग लायसन नसेल तर 5000 रुपयांचा दंड आकारला जाणार आहे. वैधता संपलेले ड्रायव्हिंग लायसन म्हणजेही विना लायसन मानण्यात येते. यामुळे १ जानेवारीपासून पुन्हा लायसन तपासणी सुरु होणार होती. यामुळे आरटीओमध्ये ऑनलाईन, एजंटांद्वारे लायसन मुदतवाढ, आरसी मुदतवाढ आणि अन्य कामांसाठी मोठी गर्दी झाली होती. अनेकांना ऑनलाईनद्वारे अर्ज केल्यानंतर महिनामहिना नंतरची तारीख मिळाली होती. हा सर्व त्रास लक्षात घेत केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्रालयाने ही मुदत तीन महिन्यांनी पुन्हा वाढविली आहे.

मुदत वाढविली म्हणजे ड्रायव्हिंग लायसन, आरसी बुक रिन्यू करून घेऊ नका असे नाही. तर या तीन महिन्यांत गर्दी न करता वाहनचालकांना काम सोपे व्हावे यासाठी याचा वापर करता येणार आहे. या काळात तुम्ही तुमची कायगदपत्रे रिन्यू करू शकणार आहात. ही सूट ज्यांच्या कायगदपत्रांची मुदत 30 मार्च 2019 नंतर संपलीय त्यांच्यासाठी लागू असणार आहे.केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने लॉकडाऊनदरम्यान एका आदेश जारी करून मुदत संपलेले ड्रायव्हिंग लासयन्स, आरसी, फिटनेस सर्टिफिकेट, परमिट आणि अन्य कागदपत्रांची वैधता ३० जून २०२० पर्यंत वाढवली होती. मात्र जून महिन्यापर्यंत परिस्थितीत फार सुधारणा न झाल्याने ही मुदत ३० सप्टेंबरपर्यंत वाढवली गेली होती. या मुदतीमध्ये सरकारने तिसऱ्यांदा वाढ करून ती डिसेंबर २०२० पर्यंत वाढवली होती.


**निधी ग्रॅनाइटस लिमिटेड**
सीआयएन क्र.:
एल५१९००एमएच१९८१पीएलसी०२५६९३
नोंदणी कार्यालयः ९ पोपट बापा शॉपिंग सेंटर, २ रा मजला, स्टेशन रोड, सांताक्रूझ(पश्चिम), मुंबई – ४०००५४. ई-मेल आयडी:pushpraj0201@gmail.comदूर क्र.: (०२२) २६४९१०४०;
संकेतस्थळ:www.nidhigranites.com

**सूचना**

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे कीसेबी(लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर) नियमावली, २०१५ च्या नियम ४७ सह वाचल्या जाणाऱ्या नियम २९ च्या अनुसार ३१डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या तिसऱ्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठीअलेखापरीक्षितवित्तिय निष्कर्ष अन्य बाबींसोबत विचारकरून संमत करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठकसोमवार,११ जानेवारी२०२१रोजी सकाळी ११.३० वा. ९ पोपट बापा शॉपिंग सेंटर, २ रा मजला, स्टेशन रोड, सांताक्रूझ(पश्चिम), मुंबई – ४०००५४ येथे होणार आहे. उपरोक्त सूचना कंपनीच्याwww.nidhigranites.comह्या संकेतस्थळावर आणि स्टॉक एक्स्चेंज च्या म्हणजेच www.bseindia.com वर देखील उपलब्ध आहे.

निधी ग्रॅनाइटस लिमिटेड, करीता
सही/-
ठिकाणः मुंबई निधी अग्रवाल
दिनांकः २६.१२.२०२० व्यवस्थापकीय संचालक